ISSN : 2278-5639
Impact Factor : 1.883

Volume - IV Special Issue-III March, 2016

J.T.S.S.P.M.

# SHRI SHIV CHHATRAPATI COLLEGE

BODKENAGAR, JUNNAR - 410 502, DIST-PUNE



## National Workshop on Human Rights and Vulnerable Groups

5 to 11 March, 2016





*Chief Editor*
*Prof. Abhijit Patil*

*Offg. Principal*
*Dr. Bhaskar Shelke*

*Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ) Nashik Road, Nashik-422101.*

J.T.S.S.P.M.

# SHRI SHIV CHHATRAPATI COLLEGE,

BODKENAGAR, JUNNAR - 410 502, DIST- PUNE

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# National Workshop on Human Rights and Vulnerable Groups

5 to 11 March, 2016

Chief Editor
Prof. Abhijit Patil

Offg. Principal
Dr. Bhaskar Shelke

Publication
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
Nashik Road, Nashik - 422101.

## National Workshop on
## HUMAN RIGHTS AND VULNERABLE GROUPS

## Proceeding

@ A11 rights reserved .No part of this publication may be transmitted, in any form or any without permission any person who does any unauthorized Act in relations to this publication may be liable to criminal prosecution and civil claim for damages. The facts, figure and views contained in various papers and abstracts being published in this book are obliviously given by the author of the papers. The editor is not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.

**Date Of Publication :** 05 March, 2016

**Publisher :**
Mr. Ramraje Rakesh Ashok (09922444833)

**Printers :**
Vibhav Enterprises (9423973169)
Nashik.

ISSN : **2278 – 5639**

**Publication :**
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ),
A2, Yogeshwar Park Aparment, Ingale Nagar, Jail Road,
Nashik Road, Nashik - 422101. Maharashtra.
Email ID: goeiirj@gmail.com.
Web : www.goeiirj.com

# CONTRIBUTORS


| Sr. No. | Title of the Article & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Poverty and Human Rights<br>Offg. Prin. Dr. Bhaskar Shelke, Dr. Divendra Ujagare | 5 |
| 2 | Migrants Workers and Constitution of India<br>Nabde Vilas Vitthal, Prof. Abhijit Patil | 7 |
| 3 | Migrants Workers and Human Rights in India<br>Prof.Sunil Jaising Kavade | 9 |
| 4 | Human Rights of older people in India study of legal status in Indian perspective<br>Prof. Dr. Jainuddin R. Mulla | 12 |
| 5 | Human Rights: Minorities, Vulnerable and Disadvantaged Groups<br>Dr. Vilas Awari | 18 |
| 6 | Human Rights and Poverty: Is poverty a violation of Human Rights<br>Dr. Kanawade M. S. | 20 |
| 7 | Woman and Human Rights<br>Dr. Tanpure Sambhaji Shamrao | 25 |
| 8 | Human Rights - The Old & the Aged: A Perspective<br>Dr. Urmila Sanyal | 27 |
| 9 | Child and Human Rights<br>Prof. Sanjay A. Marathe | 30 |
| 10 | Human Rights in respect to Poverty and Social Justice<br>Dr. Sanjay L. Argade | 34 |
| 11 | Human Rights and Women in India<br>Dr. Suresh M. Devare | 36 |
| 12 | Human Right to Education<br>Mr. Milad Ghiasi, Dr. Saeideh Shariati Najafabadi | 39 |
| 13 | Child labour: Definition, Causes, Problems and solutions<br>Dr. Bhushan Vitthal Tagad | 43 |
| 14 | Aged Person and Human Rights<br>Ms . Preeti Tukaram Pawar/Sawale | 46 |
| 15 | Migrating Labours of Sugar Industry : Safety, Security, Facilities and Human Rights<br>Prof. Dattaprasad Dnyandeo Palwe | 50 |
| 16 | Human Rights and Women<br>Prof. Sarika Pandurang Shinde | 53 |

Impact Factor : 1.883 (IIFS)
Peer-Reviewed Journal { Bi-Monthly}
ISSN 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ),
Volume - IV, Special Issue - III, March - 2016

| Sr. No. | Title of the Article & Author | Page No. |
|---|---|---|
| 17 | Human Rights and Muslim women<br>Dr. Baig Rehanara Ismail | 58 |
| 18 | Human Rights and Minorities in India<br>Dr. Vinay Rananaware | 60 |
| 19 | Human Rights and Children<br>Dr. M. R. Avghade, Prof. Ashok Prakash Shelke | 63 |
| 20 | Human Rights and Disabled People<br>Prof. Dr. Hemlata Arvind Rathod | 67 |
| 21 | Women and Human Rights<br>Prof. Shinde Ashok Vaijanath | 69 |
| 22 | A new method to inculcate the concepts of Human Rights and to increase their coverage to common peoples in India<br>Prof. Savita S. Rahangdale | 73 |
| 23 | Woman dignity: Study of Human Rights With Reference to Shashi Deshpande's Novel A Matter of Time Dr Chandrakant R. Mandlik | 78 |
| 24 | Women's Rights as Human Rights<br>Dr. Jyoti Papa Bidlan | 81 |
| 25 | Human Rights and Child development go hand in hand<br>Ms. Asha D. Sherkhane | 85 |
| 26 | अल्पसंख्यांक आणि मानवी हक्क<br>डॉ. बी. जी. भोसले प्रा. आर. के. बाबर | 88 |
| 27 | स्त्रीजीवन व मानवी हक्क<br>डॉ. भाऊसाहेब गव्हाणे | 90 |
| 28 | मानवी अधिकार आणि स्त्रिया<br>प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे | 93 |
| 29 | महिला अधिकार व सद्यस्थिती<br>प्रा. गायकवाड संजय संभाजीराव | 96 |
| 30 | मानवी हक्क आणि दारिद्र्य<br>श्री. सुनील दादाराम पवार | 103 |
| 31 | मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र<br>झगडे नाना सोपान | 105 |
| 32 | मानवी हक्क आणि महिला<br>प्रा. शशिकांत जळबाजी हाटकर | 110 |
| 33 | बालकांचा मानवाधिकार<br>प्रा. डॉ. अशोक कडूभाऊ कानडे | 112 |

Impact Factor : 1.883 (IIFS) Peer-Reviewed Journal { Bi-Monthly} ISSN 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ),
Volume - IV, Special Issue - III, March - 2016


| Sr. No. | Title of the Article & Author | Page No. |
|---|---|---|
| 34 | मानवी अधिकार आणि महिला सबलीकरण<br>प्रा. डॉ. सौ. वंदना विनायक नढे | 115 |
| 35 | पारधी जमात आणि मानवी हक्क<br>सहा. प्रा.रणदिवे टी.वाय. सहा.प्रा.सुपेकर व्ही.पी. | 117 |
| 36 | स्त्रिया आणि मानवी हक्क<br>डॉ. वैजयंतीमाला जाधव | 119 |
| 37 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार<br>प्रा. चव्हाण जी. पी. | 121 |
| 38 | मानवी हक्क व भारतीय स्त्रीयांची बदलती स्थिती<br>प्रा. भाऊसाहेब सांगळे | 123 |
| 39 | भारतीय कशामगारांच्या समस्या<br>प्रा. डॉ. प्रमोदिनी विठ्ठल कदम | 125 |
| 40 | महिला हक्क आणि कायदे<br>प्रा. डॉ. राहुल यशवंत माने | 128 |
| 41 | पारधी अधिकारांची मौलिकता : एक विवेचन<br>प्रा. डॉ. उगले ए. बी. | 132 |
| 42 | मानवी हक्क आणि भटके विमुक्त समाज<br>प्रा. मुळूक एस.एस. | 134 |
| 43 | भारतीय मानवी हक्काचे उल्लंघन<br>प्रा. खोपले डी. एल. | 136 |
| 44 | वृद्ध आणि मानवी हक्क<br>प्रा. नवनाथ नागरे | 140 |
| 45 | स्त्रीवाद आणि मानवी हक्क<br>प्रा. काळे संजय अंकुश | 143 |
| 46 | पारधी हक्क व महिला : भारतीय वस्तुस्थिती<br>काळे अविनाश राजाभाऊ विशाल व्यंकट रणखांब | 146 |
| 47 | मानवी अधिकार आणि आदिवासी समाज<br>प्रा. प्रदिप वि. देशपांडे | 149 |
| 48 | विकलांग आणि मानवी अधिकार<br>प्रा. डॉ. सुहास आव्हाड | 155 |
| 49 | अपंग व्यक्तींचे मानवी हक्क आणि भारत सरकारची भूमीका : एक चिकित्सक अभ्यास<br>किर्तीकर वाल्मीक भीमराव | 158 |
| 50 | भारतीय संविधान में मानवाधिकारों का महत्व<br>डॉ. नारायण पोहकर | 161 |
| 51 | मानवाधिकार : अल्पसंख्यांक और भारतीय राजनीति<br>डॉ. जी. आर. अवचार | 164 |
| 52 | व्यक्ति की गरिमा और मानव अधिकशार<br>डॉ. बाबासाहेब माने | 167 |

Impact Factor : 1.883 (IIFS) Peer-Reviewed Journal { Bi-Monthly} ISSN 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ),
Volume - IV, Special Issue - III, March - 2016

# ३६ स्त्रिया आणि मानवी हक्क

**डॉ. वैजयंतीमाला जाधव**
मॉर्डन महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे – ४११००५

मानव अधिकारांचा विचार करत असताना जगातील सर्व मानवांनी मिळून हे विश्वरूपी कुटुंब बनले आहे अशी एक संकल्पना प्रथम आपल्यासमोर उभी राहते. या कुटुंबातील सर्वच सदस्य महत्त्वाचे ठरतात. स्वभावप्राप्त हक्क (नॅचरल राइट्स) म्हणून पूर्वापार ओळखल्या जाणाऱ्या हक्कांनाच २०व्या शतकात मानवी हक्क ही संज्ञा प्राप्त झाली. जॉन लॉक या तत्त्वज्ञाने जीवित, स्वातंत्र्य व मालमत्ता अशा तीन हक्कांसंबंधी लिहीले आहे. लॉकची विचारसरणी आणि इंग्लिश हक्क विधेयक यांचा सर्व पुढारलेल्या जगावर मोठा प्रभाव पडला. जून १७७६ मध्ये अमेरिकेतील व्हर्जेनिया येथे भरलेल्या अमेरिकन प्रातिनिधिक सभेने मानवी हक्कांची एक सनद मंजूर केली. 'निसर्गतः सर्व माणसे सारखीच स्वतंत्र आणि मुक्त आहेत, त्यांचे काही जन्मसिद्ध हक्क आहेत आणि समाज करुन राहत असताना केलेल्या कोणत्याही करारानुसार त्यांना भावी पिढ्यांचे हे हक्क हिरावून घेता येणार नाहीत. जिवित व स्वातंत्र्य उपभोगण्याच्या, मालमत्ता संपादन करण्याची साधने व मार्ग उपलब्ध असण्याचा आणि सुखाचा पाठलाग करण्याचा व ते प्राप्त करुन घेण्याचा हक्क असे हे हक्क आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या घटना समितीने मानवी व नागरी हक्कांचा जाहिरनामा घोषित केला. २६ जून १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्कांसाठी अनेक करार करण्यात आले. भारतानेही मानवी हक्कांच्या रक्षणाचे अनेक आंतरराष्ट्रीय करार अंगिकारले आहेत.

मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या अधिकारांना मानवी अधिकार असे म्हटले जाते. सर्व स्त्री, पुरुष, मुले हे कोणत्याही वंशाचे–पंथाचे असले तरी समानतेच्या तत्त्वानुसार सारख्याच अधिकारांचे त्यांच्या जन्मापासून ते हक्कदार असतात. भारताने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचा स्वीकार केला व ही घटना २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आली, कार्यरत झाली. पारतंत्र्यामुळे अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा या दोषामुळे भारतीय समाज मुलभूत मानवी हक्कापासून दुरावला होता. स्त्रियांचे स्थान गौण होते. सतीच्या चालीवर कायद्याने बंदी आली तरी तिचे उदात्तीकरण करणे थांबले नव्हते. स्त्रियांचे समाजातील स्थानही अत्यंत दुय्यम दर्जाचे होते. स्त्रियांना शिक्षणापासून बहुतांशी दूर ठेवले जात होते. अशा समाजाला मानवी हक्काचे संरक्षण मिळवून देणे ही त्या काळाची नितांत गरज होती. १० डिसेंबर १९४८ रोजी राष्ट्रसंघाच्या महासभेने मानवी हक्कांची विश्वघोषणा स्वीकृत केली. भारताला स्वातंत्र्य मिळणे, घटना समितीने घटना तयार करणे. या घटना समकालीन आहेत. घटनेच्या भाग चारमध्ये राज्याच्या धोरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित केली आहेत. भाग चारमधील मार्गदर्शक तत्त्वात स्त्रियांच्या अनुरोधाने पुढील मानवी हक्कांचा उल्लेख करण्यात येईल.

**कलम ३६ :–**

राज्य आपल्या योजना व धोरणांचे द्वारे पुढील गोष्टी साध्य करावयाचा प्रयत्न करेल.

१) स्त्री–पुरुषांना चरितार्थाच्या पुरेशा संधींची उपलब्धता.

२) सर्व स्त्री–पुरुषांना समान कामासाठी समान वेतन.

३) कोणत्याही कामगार स्त्री–पुरुषांच्या आणि लहान मुलांच्या आरोग्याचा गैरवापर होणार नाही व आर्थिक गरजांसाठी त्यांच्या वयास व आरोग्यास योग्य नसलेला व्यवसाय त्यांना करावा लागणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने भाग ३ मध्ये दिलेल्या मुलभूत हक्कांचा अर्थ उदारमतवादी पद्धतीने लावला आहे व त्यासाठी त्यांनी भाग ४ मध्ये तरतुदींचा आधार घेतला आहे. या दोन्ही भागातील तरतुदींचा अर्थ एकत्रपणे लावून भारतातील लोकांना मार्गदर्शक तत्त्वात उल्लेखलेले हक्कही उपलब्ध करुन दिलेले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने घराबाहेर काम करणाऱ्या स्त्रियांच्या संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचारामुळे स्त्री–पुरुष समानतेच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन होते. राजस्थानमधील खेड्यात काम करत असलेल्या

ग्रामसेविका बनवारीदेवी यांच्यावरील झालेल्या अत्याचारा संदर्भात जनहित याचिका दाखल करण्यात आली. तेव्हा ती कलम ३२ ग खाली करुन घेण्यात आली. बनवारीदेवी या समाजातील घातक प्रवृत्तींना आळा घालण्याचे काम करत होत्या. देशात कायद्याचे राज्य राखायचे असेल तर स्त्री-पुरुष समानता सर्व क्षेत्रात दृढपणे प्रस्थापित झाली पाहिजे. स्त्रियांना निर्भयपणे वावरता येईल अशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे.

स्त्रियांच्या विरुद्धचे सर्व भेदभाव निर्मूलन आंतरराष्ट्रीय करारनामा (CEDAW या नावानी ओळखला जाणारा) ३ सप्टेंबर १९७९ रोजी कार्यरत झाला व त्यात भारताने ९ जुलै १९९३ ला स्वीकृती दिली.

यातील कलम ११ पुढीलप्रमाणे आहे,

रोजगार करण्याचा मानवी अधिकार सर्वांना आहे. हा अधिकार कोणासही काढून घेता येणार नाही.

रोजगाराच्या क्षेत्रात स्त्रियांच्या बाबतीतील भेदभावाचे निर्मूलन होऊन स्त्रियांना समान हक्क मिळतील. तसेच कामाच्या जागी स्त्रियांना सुरक्षित वातावरणात काम करता येईल याची सुनिश्चिती करण्यासाठी करारनाम्याची सदस्य राष्ट्रे सर्व उपाययोजना करतील.

या करारनाम्यातील तरतुदीनुसार भेदभाव निर्मूलन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

लैंगिक छळवणुकीसारख्या स्त्रियांच्या संदर्भातील विशिष्ट हिंसाचारांनी त्यांच्या नोकरीतील समानतेच्या हक्कास बाधा पोहचते. शिफारसीमध्ये लैंगिक छळवणुकीची व्याख्याही दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्याख्या करताना या शिफारशी मधील बराच भाग स्वीकृत केला आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा हक्क ज्यात लैंगिक अत्याचारापासून संरक्षण व सन्मानाने काम करण्याच्या हक्काचा समावेश होतो. जागतिक स्तरावर मान्यता पावलेला हा मानवी अधिकार आहे.

भारतातील स्त्रियांच्या विकासासाठी, सबलीकरणासाठी संख्यात्मक पाठबळाचा विकास करणे हा लिंगभाव समता प्रस्थापित करण्याचा अविभाज्य भाग होय. लिंगभाव न्यायतेची जाणीव आणि स्त्रियांच्या प्रगतीकरता सक्षम भूमिका वटविण्याच्या उद्देशाने व वातावरण निर्मिती करण्याच्याही उद्देशाने भारत सरकारने दोन आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यातील पहिला आयोग **'राष्ट्रीय महिला आयोग' (National Commission for Women NCW)**

आणि दुसरा आयोग हा राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (National Human Right Commission NHRC)

राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ ला तर राष्ट्रीय मानवी आयोगाची स्थापना १९९३ ला झाली.

स्त्रियांसंबंधीच्या हक्कांचे जतन करणाऱ्या अनेक तरतुदी भारतीय राज्यघटनेत असल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष फायदा स्त्रियांना वास्तवतेत किती प्रमाणात मिळतो हे पाहणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानात कलम १४, कलम १५, कलम १६ (१) व १६ (२), कलम ३९ (अ), कलम ३९ (ब), कलम ३९ (क), कलम ५१ (फ) यानुसार स्त्रियांना जास्तीत जास्त हक्क मिळण्याची तरतुद केली आहे. स्त्रियांच्या संदर्भातील सर्व प्रश्नांचा सर्वांगीण विचार करणारे 'राष्ट्रीय महिला सक्षमीकरण किंवा सबलीकरण धोरण' (National Policy for Women Empowerment) भारत सरकारने २००१ साली जाहीर केले. स्त्रियांची प्रगती, त्यांचा विकास आणि त्यांचे सक्षमीकरण हे घटक या धोरणाच्या ध्येयात समाविष्ट झाले आहेत. स्त्रियांना पूर्वी जे हक्क नाकारण्यात आले होते ते त्यांना घटनेच्या किंवा कायद्याच्याद्वारे प्रदान करणे सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत येते. एकूणच स्त्रियांच्या हक्कांबाबत विविध आयोग आणि शासकीय पातळीवर काम करणाऱ्या संस्था जागरुक असलेल्या दिसतात.

-----